# SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO


---

## (असाधारण)

## मंगळवार, दिनांक १६ एप्रिल, २०१९

## अधिसूचना

क्र. : ३५/२०१९ दिनांक :- १६.४.२०१९

**विषय : महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ .... अधिष्ठाता तदर्थ नामनिर्देशन आणि अंतरिम अधिष्ठाता मंडळाबाबत.**

संदर्भ : असाधारण अधिसूचना क्र. ३०/२०१८, दि. १३.४.२०१८

संदर्भांकित अधिसूचनेमध्ये उल्लेखीत विद्यापीठ प्रस्ताव व त्यानुषंगाने मा.कुलपती कार्यालयाने दिलेल्या मान्यतेच्या अधिन राहून अधिसूचनेतील उल्लेखीत विद्याशाखांकरीता नामनिर्देशित तदर्थ अधिष्ठात्यांचा कार्यकाळ दि. १२.४.२०१९ रोजी संपूष्ठात येत आहे. तथापि, अधिष्ठाता नियुक्तीची प्रक्रिया सुरू झाली असतांनाच लोकसभा निवडणूकांचा कार्यक्रम घोषित झाला. लोकसभा निवडणूक प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत निवडणूक आयोगाने घालून दिलेली आदर्श आचार संहिता लागू केल्यामुळे अधिष्ठाता नियुक्तीची प्रक्रीया प्रलंबीत आहे. या कारणामुळे विद्यापीठाच्या शैक्षणिक कामकाजामध्ये अडथळा निर्माण होऊ नये म्हणून संदर्भांकित अधिसूचनेमध्ये उल्लेखीत विद्याशाखा व त्यांच्यासमोर दर्शविलेले तदर्थ अधिष्ठाते तसेच अंतरिम अधिष्ठाता मंडळ दिनांक १३.४.२०१९ पासून एक वर्ष कालावधीसाठी किंवा नविन अधिष्ठात्यांची नियुक्ती होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल अशा कालावधीसाठी नामनिर्देशनाच्या कालावधीमध्ये वाढ करण्याला मा, कुलगुरूंनी मान्यता प्रदान केली आहे.

सर्व सामान्यांच्या माहितीकरीता याद्वारे अधिसूचित करण्यात येते की, दि. १३.४.२०१९ पासून संदर्भांकित अधिसूचनेतील तदर्थ अधिष्ठाते आणि अंतरिम अधिष्ठाता मंडळ पुढील एक वर्ष कालावधीसाठी किंवा नविन अधिष्ठात्यांची नियुक्ती होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल अशा कालावधीसाठी काम करणे सुरू राहील.

स्वा./-
(डॉ.हेमंत देशमुख)
प्रभारी कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.